विशेष दिवाणी दावा क्र.९/२०१७
गंगाधर .. वि .. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.६ **(नि.क्र.४५०)**

**शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव:-** दिनेश भिक्कन पाटील , **वय:-** ५४वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी , **रा.**अहमदपूर**, ता.**अहमदपूर जि.लातूर.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने सुरु.**

**१.** मी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमीटेड शाखा अहमदपूर येथे उपकार्यकारी अभियंता पदावर १३/०८/२०२५ पासून कार्यरत आहे. मला न्यायालयीन समन्स आहे. समन्समध्ये नमूद केल्यानुसार मी आज रोजी या दाव्याच्या अनुषंगाने संबंधीत कागदपत्रे आणलेली आहेत. मी आज रोजी वादी व प्रतिवादी यांची आमच्या कार्यालयात उपलब्ध असलेली वीजबीले आणलेली आहेत. भाग्यशाला संभाजी देपे, देपे गंगाधर अंतराम, वर्षा गंगाधर देपे, सुलोचना गंगाधर देपे, देपे वरुण गंगाधर, सुलोचना गंगाधर देपे हीचे दुसरे कनेक्शन याचे बील अशी एकुण सहा बीले आणलेली आहेत.

**२.** भाग्यशाला वगळता बाकीच्या व्यक्तीपैकी देपे गंगाधर, वरुण देपे व सुलोचना देपे यांचे कनेक्शन सन २००४ सालातील आहे. वर्षा गंगाधर देपे व सुलोचना गंगाधर देपे यांचे कनेक्शन सन २०११ सालातील आहे. सदर कनेक्शन कृषी पंपासाठीचे आहेत.

**३.** भाग्यशाला हिच्या नावचे कनेक्शन व्यक्तीश तिच्याच नावे देण्यात आले की, तिच्या नावावर वर्ग करण्यात आले हे मला सांगता येत नाही. अज्ञान व्यक्तीच्या नावेही आम्ही विदयुत पुरवठा देतो. प्रत्येकाचे ग्राहक क्रमांक वेगवेगळे आहेत. नि.क्रं.३५६ हे आमच्याच ऑफीसचे आहे. आमच्याकडील चोरी प्रकरण १६९/२००४ आहे. वीज चोरीचा भरणा १,१६,१३२/- भरल्याचे नि.क्रं.३५६ वरुन दिसते. गंगाधर देपे व वरुण देपे व सुलोचनाबाई देपे यांनी प्रत्येकी २३४७०/- इतकी रक्कम वीज बोर्डाकडून केलेल्या मागणीनुसार भरलेली आहे.

**४.** हरीबाई अंतराम देपे यांच्या नावे आमच्याकडे कृषी जोडणीसाठी खाते होते. आता मला दाखविलेली हरीबाई देपे यांनी भरणा केलेल्या

रक्कमेची पावती आता मला दाखविली. ती बरोबर आहे. त्यावर आमच्या खात्यातील संबंधीतांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ४५१** देण्यात येते. यासोबतच वीजबील आता मला दाखविले ते हरीबाई अंतराम देपे यांचे नावचे आहे. ते आमच्या कंपनीचे आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४५२** देण्यात येते. निक्रं.१८७ व १८८ या भाग्यशाला नावच्या आहेत. नि.क्रं.१८९ ही संभाजी यांच्या नावची आहेत. संभाजीच्या नावे कोपरा गावी वीजपुरवठा केल्याबद्दल आमच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. भाग्यशालाने थकीत बील मागणीपोटी बील भरल्याचे पावती आता मला दाखविली. तानाजी देपे, शांताबाई देपे व राहुल देपे यांच्याबद्दल वीज जोडणी असल्याबद्दल आमच्याकडे काही पुराव आहे का, यास माझे सांगणे की, असल्यास मी दाखल करेल. भाग्यशालाला दिलेलया जोडणीबद्दल आमच्याकडे रेकॉर्ड असेल तर मी देईन. भाग्यशालाच्या नावे १० एचपीचे कनेक्शन आहे. ते क नेक्शन विहीरीवर आहे, नदीवर आहे की, तलावावर आहे हे पाहिल्याशिवाय मला देत नाही. भाग्यशाला हीला नेमक्या कोणत्या पानाच्या स्त्रोतामधून पाणी उचलायचे होते हे आज मला सांगता येत नाही.

(उर्वरीत रेकॉर्ड आणेपर्यंत तहकूब.)

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक ३०/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.